सैन्यातील धारातीर्थी पडलेल्या महाराष्ट्रातील अधिकारी व जवान यांच्या विधवा / अवलंबितांना तसेच अपंगत्व प्राप्त झालेल्या .अधिकारी व जवानांना आर्थिक मदत देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्र.मासैम २०१०/४९५/प्र.क्र.१६९/२८
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक - ०७.०२.२०११.

वाचा - १)शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्र.मासैम १०९९/१६६१/प्र.क्र.१२६/९९/२८, दिनांक ०४.१०.२०००.

२)शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्र.मासैम २००२/९३३/प्र.क्र.८६/२००२/२८, दिनांक ०९.१२.२००३.

३)संचालक, सैनिक कल्याण विभाग, पुणे यांचे पत्र क्र.१६०१९/अ/सैकवि-१६/गौपु/४०५७, दिनांक १५.०७.२०१०..

४)संचालक, सैनिक कल्याण विभाग, पुणे यांचे पत्र क्र.१६०१९/अ/सैकवि-१६/गौपु/५६८५, दिनांक ३०.०९.२०१०..

५)संचालक, सैनिक कल्याण विभाग, पुणे यांचे पत्र क्र.१६०१९/अ/सैकवि-१६/गौपु/५६८३, दिनांक ३०.१०.२०१०..

६)संचालक, सैनिक कल्याण विभाग, पुणे यांचे पत्र क्र.१६०१९/अ/सैकवि-१६/गौपु/६१७३, दिनांक २१.१०.२०१०..

७)संचालक, सैनिक कल्याण विभाग, पुणे यांचे पत्र क्र.१६०२५/सैकवि-१६/५६८६, दिनांक ०४.१०.२०१०.

८)संचालक, सैनिक कल्याण विभाग, पुणे यांचे पत्र क्र.१६०२५/सैकवि-१६/६१७१, दिनांक २२.१०.२०१०..

९)संचालक, सैनिक कल्याण विभाग, पुणे यांचे पत्र क्र.१६०२५/सैकवि-१६/६१७२, दिनांक २२.१०.२०१०.

१०)संचालक, सैनिक कल्याण विभाग, पुणे यांचे पत्र क्र.१६०२५/सैकवि-१६/६६२४, दिनांक १५.११.२०१०.

**शासन निर्णय -**

संदर्भाधीन अ. क्र.(१) व (२) येथील शासन निर्णयाव्दारे जम्मू-काश्मिर मधील नियंत्रण रेषेजवळील क्षेत्रात तसेच देशांतर्गत भागात मे, १९९९ पासून निर्माण झालेल्या युध्दजन्य तणावाच्या परिस्थितीत/ चकमकीत /मोहिमेअंतर्गत धारातीर्थी पडलेल्या सैन्यदलातील महाराष्ट्र राज्यातील सैनिकांच्या विधवांना /अवलंबितांना प्रत्येकी रु.५.०० लाख याप्रमाणे एकवेळची आर्थिक मदत देण्याबाबत त्याचप्रमाणे गंभीररित्या जखमी होऊन अपंगत्व आलेल्यांना त्यांच्या अपंगत्वाच्या प्रमाणानुसार रु.१.०० लाख व रु.३.०० लाख आर्थिक मदत देण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. त्यानुसार संचालक, सैनिक कल्याण विभाग, पुणे यानी संदर्भाधीन अ. क्र.(३) ते (१०) येथील पत्रान्वये शासनास सादर केलेल्या प्रस्तावात अंतर्भूत खालील तक्त्यात नमूद केलेल्या युध्दजन्य परिस्थितीत/ चकमकीत /मोहिमेअंतर्गत धारातीर्थी पडलेल्या महाराष्ट्र राज्यातील जवानांच्या अवलंबितांना तसेच गंभीररित्या

जखमी होऊन अपंगत्व प्राप्त झालेल्या जवानांना खाली दर्शविल्याप्रमाणे आर्थिक मदत देण्यास शासन मान्यता देत आहे

अ) धारातीर्थी पडलेले जवान (रुपये ५ लाख प्रमाणे एक वेळेची आर्थिक मदत )

| अ.क्र. | नाव | मृत्यु दिनांक / मोहिम | वारसाचे नांव च आर्थिक मदतीची रक्कम |
|---|---|---|---|
| १ | कै.काळुबा भाऊराव बनकर, १५१२७६१५ डब्लू, हवालदार, ३२१ फिल्ड रेजीमेंट. | २७.०२.२०१० ऑपरेशन रक्षक (जम्मू - काश्मिर ) | श्रीमती सुमित्रा .काळुबा बनकर, (वीरपत्नी) - रु.३ लाख श्रीमती पार्वतीबाई भाऊराव बनकर, (वीरमाता) - रु.२ लाख मु.पो.केळगांव,ता.सिल्लोड, जि. औरंगाबाद. |
| २ | कै.हबीरराव बापूराव चौधरी, २७९३०४३ एक्स, हवालदार, ५ मराठा लाईट ईन्फंट्री, | १९.०६.२०१० ऑपरेशन रक्षक (जम्मू काश्मिर ) | श्रीमती राणी हंबीरराव चौधरी ( वीरपत्नी )- रु.३ लाख सौ सिताबाई बापूराव चौधरी (वीरमाता) - रु.१ लाख श्री. बापूराव यशवंत चौधरी (वीरपिता) - रु.१ लाख मु.पो.साडे,ता.करमाळा, जि.सोलापूर. |
| ३ | कै. महादेव रामचंद्र पवार, २७९२३०८ के हवालदार १९ मराठा लाईट ईन्फंट्री | १२.०५.२०१० ऑपरेशन फॉल्कन (पूर्व सिक्कीम ) | श्रीमती लक्ष्मी महादेव पवार, (वीरपत्नी) - रु. ३ लाख श्रीमती अनुसया रामचंद्र पवार, (वीरमाता) - रु. २ लाख मु.पो.येळवी, ता. जत,जि.सांगली. |
| ४ | कै.हिरामन उरकुडा सिंद्राम, जेसी ५६०१६२ एक्स, नायब सुबेदार, १५ बिहार रेजिमेंट | २४.११.२००९ ऑपरेशन मेंघदूत (जम्मू काश्मिर ) | श्रीमती ज्योती हरामन सिंद्राम, (वीरपत्नी) - रु. ५ लाख मु.पो.साकोली, ता. साकोली, जि.भंडारा. |

ब) गंभीररित्या जखमी होऊन अपंगत्व प्राप्त झालेले जवान

| अ.क्र. | नाव व पत्ता | मोहिम, दिनांक व अंपगत्वाचे प्रमाण | दिनांक ४.१०.२००० च्या शासन निर्णयानुसार अनुज्ञेय रक्कम |
|---|---|---|---|
| १ | श्री.भोम्बे राजु विठ्ठल, १५७८५४१७ एन नाईक २७ एअर डिफेन्स रेजिमेंट, मु.पो.आडगांव, ता.भोकरधन, जि.जालना. | १८.०३.२००६ ऑपरेशन रक्षक (जम्मु काश्मिर ) ८५ टक्के | रुपये ३.०० लाख |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | श्री.गुरुनाथ मधुकर घुडे,<br>२७९९२३९ एफ<br>शिपाई<br>५ मराठा लाईट इन्फंट्री,<br>मु.उंबरपाडा,पो.सरळगांव,<br>ता.मुरबाड,जि.ठाणे. | ०६.११.२००९<br>ऑपरेशन रक्षक<br>(जम्मु काश्मिर)<br>६० टक्के | रुपये ३.०० लाख |
| ३ | श्री.संतोष काशिनाथ फाटक,<br>२७९६४२८ ए<br>लान्स नाईक<br>२ मराठा लाईट ईन्फंट्री<br>मु.पो.खारघर, ता.पनवेंल,<br>जि.रायगड़ अलिबाग. | १४.०६.२००९<br>ऑपरेशन रक्षक<br>(जम्मु काश्मिर)<br>४० % | रुपये १.०० लाख |
| ४ | श्री.अदित्य शिवाजीराव भोसले,<br>आयसी ७००७० डब्लू,<br>कॅप्टन<br>ऑपरेशन ि-हनो (आसाम)<br>शिवाजी पेठ, कोल्हापूर. | १७.०६.२००९<br>ऑपरेशन ि-हनो (आसाम)<br>२०% | रुपये १.०० लाख |

३. वरील परिच्छेद क्र.(१) मध्ये नमूद केलेल्या धारातीर्थी पडलेल्या जवानांच्या अवलंबितांना तसेच गंभीररित्या जखमी होऊन अपंगत्व प्राप्त झालेले जवानांना द्यावयाची आर्थिक मदती रु.२८,००,०००/- (रुपये अठ्ठावीस लाख फक्त) इतक्या रक्कमेपैकी ४०% म्हणजे रु. ११,२०,०००/- ( रुपये अकरा लाख वीस हजार फक्त) शासकीय अनुदानातून तर उर्वरित ६०% रक्कम रु.१६,८०,०००/- (रुपये सोळा लाख ऐंशी हजार फक्त) मुख्यमंत्री सहायता (कारगिल) निधीतून घेण्यात आलेल्या व राष्ट्रीयीकृत बँकेत गुंतविण्यात आलेल्या रु.२२.२२ कोटी रक्कमेच्या व्याजातून अदा करण्यात यावी.

४. उपरोक्त परिच्छेद क्र. (२) मधील प्रयोजनार्थ होणारा रु. ११,२०,०००/- ( रुपये अकरा लाख वीस हजार फक्त) इतका खर्च मागणी क्र.ए-५ लेखाशीर्ष २२३५ सामाजिक सुरक्षा व कल्याण, ६० - इतर सामाजिक सुरक्षा व कल्याण कार्याक्रम, १०२- सामाजिक सुरक्षा योजनेखाली निवृत्तीवेतन- (००)(०४) देशांतर्गत सुरक्षासंबंधी मोहिमेत / चकमकीत घारातीर्थी पडलेल्या सैन्यातील जवानांच्या विधवांना / अवलंबितांना आर्थिक मदत (२२३५- २६०-८)५०-इतर खर्च या लेखाशीर्षाखाली सन २०१० - २०११ या वित्तीय वर्षाकरीता मंजूर करण्यात आलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

५. धारातीर्थी पडलेल्या जवानांच्या अवलंबितांना तसेच गंभीररित्या जखमी होऊन अपंगत्व प्राप्त झालेल्या जवानांना द्यावयाची आर्थिक मदत संबंधित जिल्हयांच्या पालक मंत्र्यांच्या हस्ते देण्यात यावी.

६. याबाबत संचालक, सैनिक कल्याण विभाग, पुणे यांनी संबंधित पुरस्कारार्थ्यांना सदरहू रक्कम लाभार्थ्याची पात्रता काळजीपूर्वक तपासून विहीत मुदतीत देण्याच्या सूंचना त्यांच्या अधिनस्त असलेल्या क्षेत्रीय अधिका-यांना द्याव्यात व तत्संबंधीचा अहवाल तात्काळ शासनास पाठवावा.

७. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने निर्गमित केलेल्या शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्र.मासैम १०९९/१६६१/प्र.क्र.१२६/९९/२८, दिनांक ०४.१०.२००० तसेच क्र. क्र.मासैम

२००२/९३३/प्र.क्र.८६/२००२/२८, दिनांक ०९.१२.२००३.मधील मार्गदर्शक तत्वांचा अवलंब करुन निर्गमित करण्यात येत आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सगणक सकेतांक क्र. २०११०२०५१५४१५३००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल याच्या आदेशानुसार व नावाने,

**सही/-**
( अ. द. जोशी )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

मा.राज्यपाल यांचे सचिव,
मा.मुख्यमंत्री यांचे सचिव,
मा.मंत्री (मासैक) यांचे खाजगी सचिव,
मा.राज्यमंत्री (मासैक) यांचे खाजगी सचिव,
सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई (शाखा ड-५/ड-६)(२० प्रती),
महालेखापाल (लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई / नागपूर,
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई / नागपूर,
कमांडर, महाराष्ट्र-गुजरात एरिया मुख्यालय, कुलाबा, मुंबई ४०० ००५,
जिल्हाधिकारी, औरंगाबाद, सोलापूर, सांगली , जालना, ठाणे, रायगड , कोल्हापूर व भंडारा,
जिल्हा कोषागार अधिकारी, औरंगाबाद, सोलापूर, सांगली , जालना, ठाणे, रायगड, कोल्हापूर व भंडारा,
संचालक, सैनिक कल्याण विभाग, पुणे ४११ ००६ ( ५ प्रती),
जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी,औरंगाबाद, सोलापूर, सांगली , जालना, ठाणे, रायगड, कोल्हापूर,व भंडारा,
सह संचालक, लेखा व कोंषागार, संगणक कक्ष, ५ वा मजला, नवीन प्रशासन भवन, मुंबई ३२,
महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई,
वित्त विभाग (व्यय ४), मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
सामान्य प्रशासन विभाग (कार्या २५),मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
निवड नस्ती (२ प्रती).